**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ७६/२०१६-१७/१८७          दिनांक: १६.०५.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ७६/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विलास पांडूरंग पाटील :<br>मु. पो. बांबवडे<br>ता. शाहूवाडी, जिल्हा. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग शाहूवाडी | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) उपरोक्त तक्रारदार यांनी त्यांना शेती पंपासाठी त्वरीत नविन वीज जोडणी मिळणेसाठी आणि नुकसान भरपाई मिळणेसाठी सदर गा-हाणे दि. ३१-०३-२०१७ रोजी या मंचासमोर दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) तक्रारदार श्री विलास पांडूरंग पाटील रा. बांबवडे ता. शाहूवाडी यांनी दि. १८-०२-२०१३ रोजी कृषी पंपासाठी वीज जोडणी मिळणेबद्दल वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात अर्ज सादर केला. परंतु वीज जोडणी देणेत आली नाही. त्यांच्या नंतर अर्ज केलेल्या ग्राहकास वि.प. यांनी वीज जोडणी दिली आहे. सन २०१० मध्ये तक्रारदार यांना जवाहर रोजगार योजनेतून विहीर मंजूर झाली आहे. त्यांनी दि. ०७-०३-२०१७ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि. २४-०३-२०१७ रोजी आदेश करुन, जेष्ठता यादीनुसार , काम पूर्ण झाल्यानंतर कनेक्शन देण्यात यावे असा निर्णय दिला. त्यावर नाराज होऊन तक्रारदार यांनी या मंचाकडे हे अपिल दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) तक्रारदार यांनी दि. १८-०२-२०१३ च्या सादर केलेल्या अर्जामध्ये काही त्रुटी होत्या त्या त्यांनी नोव्हेंबर २०१४ मध्ये पूर्ण केल्यानंतर लगेच मंजूरी देणेत आली. तक्रारदार यांनी दि. २४-१२-२०१४ रोजी जरुर ती रक्कम भरणा केली. त्यांना वीज जोडणी देणेसाठी उच्च दाब ०.४८ कि.मी. लघुदाब ०.४८ कि.मी. व १०० के.व्ही रोहित्र उभाणे करणे आवश्यक आहे. सन २०१४-१५च्या जेष्ठता यादीत तक्रारदार यांना ७५ हा क्रमांक आहे. नविन एजन्सी मिळाल्यानंतर त्वरीत काम पूर्ण करुन त्यांना वीज जोडणी देण्यात येईल.

४) सदर प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दि. ०४-०५-२०१७ रोजी घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते. वि.प. तर्फे श्री शामराज ए.ए. उपकार्यकारी अभियंता उपविभाग शाहूवाडी हे हजर होते. उभयतांची तोंडी निवेदने ऐकणेत५ आली. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार हे नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहेत काय?

उत्तरः- नाही.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी कृषीपंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेबद्दल दि. १८-०२-२०१३ रोजी वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात अर्ज सादर केला होता. त्यामध्ये काही त्रुटी असल्याने त्यांना वि.प. यांनी दि. २५-०२-२०१३ व दि. ०५-११-२०१४ च्या पत्राद्वारे पूर्तता करणेस कळविले होते. तक्रारदार यांनी जरुर ती पूर्तता दि. ११-११-२०१४ रोजी केल्यानंतर त्यांच्या प्रस्तावाला दिनांक १५-११-२०१४ रोजी मंजूर देणेत आली. त्यानंतर तक्रारदार यांनी दि. २४-१२-२०१४ रोजी जरुर ती रक्कम भरणा केली. सन २०१४-१५ च्या जेष्ठता यादीत तक्रारदार यांचा ७५ वा क्रमांक आहे.मार्च-२०१४ पर्यन्तची जेष्ठता यादीतील कामे पूर्ण झाली आहे. असे दिसते. की, तक्रारदार यांना वर्षात नियमानुसार नविन वीज जोडणी मिळाली नाही. त्यांना दि. २४-१२-२०१५ पर्यन्त वीज जोडणी मिळणे आवश्यक होते.

७) विद्युत कायदा २००३ चे कलम ४३ आणि कृतिमानके विनियमानुसार तक्रारदार यांना विशिष्ट कालावधीत वीज जोडणी देणेत आली नाही हे निश्चित आहे. सदरच्या कायद्यातील तरतूदींचे पालन होणेआवश्यक आहे. वीज जोडणी देण्यात जरी वि.प. यांना काही अडचणी येत असतील तर उपरोक्त कायद्यानुसार निश्चित कालावधीत वीज पुरवठा करणे आश्यक असते. त्यामुळे तक्रारदार हे नविन वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत असे या मंचास वाटते.

८) तक्रारदार यांनी अत्यंत मोघमपणे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. विलंबाची भरपाई मागितलेली नाही. नुकसान भरपाईची मागणी रक्कमही नमूद केलेली नाही. तोंडी युक्तिवादात केवळ नुकसान भरपाई मंजूर करावी. अशी संदिग्ध स्वरुपाची विनंती केली आहे. सबब , या प्रकरणात अशा त-हेची भरपाई मंजूर करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेती पंपासाठी नविन वीज जोडणी (ग्राहक क्र. २६०१००७०२२५०) वि.प. यांनी दि. ३१.०८.२०१७ पर्यन्त देऊन वीज पुरवठरा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |